**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीसाठी २८७ मतदारसंघांत छाननीअंती ७ हजार ५० उमेदवारांचे अर्ज वैध
- राज्यभरात दीपावलीचा उत्साह
- आगामी २५ वर्षांत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राष्ट्रीय एकता अतिशय महत्त्वाची असून फुटीरतावादी शक्तीपासून सावधान राहावं असं प्रधानमंत्र्यांचं आवाहन
- केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि केंद्रीय पोलीस संघटनांच्या ४६३ कर्मचाऱ्यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक पुरस्कार प्रदान

  **आणि**

- नवी मुंबईत काल झालेल्या गॅस सिलिंडरच्या स्फोटात तीन जणांचा मृत्यू, तर बोईसर इथं चार जण जखमी

**<><><><><>**

राज्य विधानसभा निवडणुकीसाठी २८७ मतदारसंघांत उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या एकंदर ७ हजार ९६७ उमेदवारांपैकी ७ हजार ५० उमेदवारांचे अर्ज छाननीअंती वैध ठरवण्यात आले आहेत. तर ९१७ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले आहेत. या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत, म्हणजेच २९ ऑक्टोबरपर्यंत राज्यातल्या सर्व २८८ मतदारसंघांसाठी ७ हजार ९९५ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले होते. त्यांची छाननी काल करण्यात आली. नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघात २७ उमेदवारांपैकी २२ जणांचे अर्ज वैध

ठरले असून ४ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरवण्यात आले आहेत. या मतदारसंघातल्या एका उमेदवाराच्या अर्जाची छाननी आज होणार असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. त्यानंतर संपूर्ण राज्याचं चित्र स्पष्ट होईल.

दरम्यान विविध राजकीय पक्षांनी आपापल्या उमेदवारांसाठी प्रचाराची मोर्चेबांधणी केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याही प्रचारसभा राज्यात होणार असून त्यातली पहिली सभा येत्या८ नोव्हेंबरला धुळ्यात होणार आहे. त्याखेरीज जळगाव आणि मालेगाव बाह्य या मतदारसंघातही त्यांच्या सभा होतील. महायुतीने स्टार प्रचारक म्हणून ४० प्रमुख नेत्यांची नियुक्ती केली आहे. यात जेपी नड्डा, गृहमंत्री अमित शाह, राजनाथ सिंह, नितिन गडकरी, योगी आदित्यनाथ यांच्यासारख्या दिग्गजांचा समावेश आहे.

**<><><><><>**

महायुतीचे तिन्ही पक्षांकडून बंडखोरांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी चर्चा करून अर्ज परत घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. काँग्रेस नेते रवी राजा यांंनी आज भाजपात प्रवेश केला, तेव्हा फडणवीस बोलत होते. रवी राजा यांच्या अनुभवाचा फायदा भाजपला होईल. रवी राजा यांच्या माध्यमातून काँग्रेसचे अनेकजण भाजपमध्ये येतील, असा विश्वास फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. रवी राजा शीव कोळीवाडा मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढवण्यास इच्छुक होते, मात्र त्यांना डावलण्यात आल्यामुळे त्यांनी पक्ष सोडल्याचं सांगितलं जात आहे. त्यानंतर भाजपाचे मुंबई उपाध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **लातूर आणि धाराशिव** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

मुंबई विद्यापीठातर्फे पेट अर्थात पीएचडी प्रवेश परीक्षा १७ नोव्हेंबरला घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी प्रवेशपूर्व ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ४ नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. चारही विद्याशाखेतल्या विविध ७६ विषयांसाठी ही परीक्षा सीबीटी पद्धतीनं होणार आहे.

<><><><><>

एव्हरेस्ट पर्वतशिखर सर करणाऱ्या सोळा वर्षीय गिर्यारोहक काम्या कार्तिकेयनचं राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी अभिनंदन केलं आहे. यावर्षी मे महिन्यात काम्यानं एव्हरेस्ट शिखर सर करुन भारतातली सर्वात तरुण आणि जगातली दुसरी सर्वात तरुण गिर्यारोहक होण्याचा मान मिळवला, असल्याचं तिच्या वडिलांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

देशासह राज्यभरात  आज दिवाळीचा सण आनंद आणि उत्साहात साजरा केला जात आहे. घरोघरी पणत्या लावून, आकाशकंदिल लावून आणि रोषणाई करून प्रकाशाचा हा सण साजरा केला जात आहे. दिवाळीच्या निमित्तानं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

दिवाळीचा सण हा आनंद आणि उत्साहाचा सण असून तो अज्ञानावर ज्ञानाच्या आणि वाईटावर चांगल्याच्या विजयाचं प्रतीक आहे असं राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. हा सण म्हणजे गरीब आणि गरजूंना मदत करण्याची आणि आपला आनंद त्यांच्याबरोबर वाटून घेण्याचीही संधी आहे, असंही मत त्यांनी व्यक्त केलं आहे.

दिवाळीचा सण फक्त भारतात नव्हे तर जगभरातल्या भारतीयांकडून आनंद आणि उत्साहात साजरा केला जातो, असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. दिवाळी सणाच्या प्रकाशानं देशाला एकात्मता, संपन्नता आणि अमर्यादित प्रगतीचा मार्ग दाखवावा अशा सदिच्छा त्यांनी व्यक्त केल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही समाजमाध्यमांवरून शुभेच्छा दिल्या आहेत. तसंच कच्छ इथं लष्कराच्या जवानासोबत दिवाळी साजरी केली.

राज्यात नरकचतुर्दशीनिमित्त आज घरोघरी प्रथेनुसार पहाटे चंद्रोदयापूर्वी अभ्यंगस्नान करुन सर्वांनी दीपावलीचा आनंद लुटला.  मुंबई, ठाणे, डोंबिवली, कल्याण आणि इतर विविध शहरांमधे उंची वेशभूषा करुन तरुणाई या निमित्ताने एकत्र जमून एकमेकांना शुभेच्छा देत हा सण साजरा करते. दिवाळी पहाटेनिमित्त

ठिकठिकाणी संगीत, नृत्य आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. ठिकठिकाणी रांगोळ्यांनी अंगणं, आवारं, आणि रस्ते सजले आहेत. घरोघरी विविध आकारांचे आकाशकंदिल आणि विजेच्या दिव्यांची रोषणाई करण्यात आली आहे. मुंबई शहरातल्या जागतिक वारसा सांगणाऱ्या इमारतींवरही दिवाळीनिमित्त विविध रंगी दिव्यांची आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे.

**<><><><><>**

पुढच्या २५ वर्षांत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राष्ट्रीय एकता अतिशय महत्त्वाची असून फुटीरतावादी शक्तीपासून सावधान राहावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने गुजरातमधल्या केवडिया इथं राष्ट्रीय एकता दिवसाच्या कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. सरकार मागच्या दहा वर्षांपासून एक राष्ट्र या भावनेला बळकट करत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. देशासमोर अनेक आव्हानं असून यापासून देशाची एकता आणि सुरक्षा याला धोका निर्माण होत आहे असं सांगत नागरिकांनी विविधतेच्या भावनेला आत्मसात करावं असं आवाहनही मोदी यांनी केलं. भारत आज प्रगतीशील, सर्वसमावेशक आणि विवेकवादी देश म्हणून नावारुपाला आला असून जगाचं नेतृत्व करत आहे, असंही प्रधानमंत्री म्हणाले.

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आज देशभरात राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरी होत आहे. नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी पटेल चौक इथं त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.

**<><><><><>**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि जगदीप धनखड यांनी आज सकाळी पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करत अभिवादन केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधल्या एकता नगर इथल्या स्टॅच्यू ऑफ युनिटी इथं जाऊन सरदार पटेल यांना जयंतीनिमित्त अभिवादन केलं.

नवी दिल्लीच्या जुन्या संसद भवनातल्या मध्यवर्ती सभागृहात सरदार पटेल यांच्या प्रतिमेला संसद सदस्यांनी तसंच दोन्ही सभागृहांच्या महासचिवांनी पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहिली. १९५८ मधे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते या भित्तीचित्राचं अनावरण झालं होतं.

एकता दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत.

**<><><><><>**

यंदाच्या राष्ट्रीय एकता दिवसाच्या कार्यक्रमासाठी रायगड किल्ल्याची थीम निवडली आहे. रायगड हा छत्रपती शिवाजी महाराज यांचा वारसा, राजनैतिक प्रतिभा आणि नेतृत्वाचं प्रतीक आहे असे गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज काढले. रायगड किल्ला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याचं उदाहरण आहे, असंही प्रधानमंत्री समाजमाध्यमावरल्या आपल्या पोस्टद्वारे म्हणाले.

**<><><><><>**

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १४९ व्या जयंतीनिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुंबईत राजभवन इथं सरदार पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं. त्यानिमित्त राज्यपालांनी राजभवनातले कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना राष्ट्रीय एकतेची शपथ दिली.

दिवंगत प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या ४० व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला देखील राज्यपालांनी पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.

नाशिकच्या आरोग्य विज्ञानपीठात सरदार पटेल आणि इंदिरा गांधी यांना आदरांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

विविध राज्यं तसंच केंद्रशासित प्रदेशात कार्यरत केंद्रीय सशस्त्र पोली दल, आणि केंद्रीय पोलीस संघटनांच्या ४६३ कर्मचाऱ्यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकं आज प्रदान करण्यात आली. तपास, विशेष मोहीम, फॉरेन्सिक सायन्स या क्षेत्रात सर्वोत्तम कार्य, उच्च नैतिक मूल्य जपल्याबद्दल हे पुरस्कार दिले जातात. यावर्षी १ फेब्रुवारीपासून केंद्रीय गृहमंत्री दक्षता पुरस्कार द्यायला सुरुवात झाली. दरवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीदिवशी म्हणजेच ३१ ऑक्टोबर रोजी या पुरस्कारांची घोषणा केली जाईल, असं गृहमंत्रालयाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

नवी मुंबईतल्या उलवे इथं काल संध्याकाळी उशिरा तीन गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन एका दुकान आणि घराला लागलेल्या भीषण आगीत एका कुटुंबातल्या तीन

जणांचा मृत्यू झाला. दुकानाचा मालक गंभीर जखमी असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर त्याची पत्नी आणि दोन मुलांचा दुर्घटनेत मृत्यू झाला आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात बोईसर इथं  एका घरात काल रात्री स्फोट होऊन चारजण गंभीर जखमी झाले आहेत. अवधनगर भागात झालेल्या या स्फोटामुळे घरातल्या भिंतीचा काही भाग कोसळल असून शोजारच्या घरांच्या भिंतीनाही तडे गेले आहेत. जखमींवर उपचार सुरु आहेत, बोईसर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असून तपास सुरु आहे अशी माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><><>**

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांना आज पहाटे छातीत दुखण्याचा त्रास होऊ लागल्यानं पुण्यातल्या रुग्णालयात भरती करण्यात आलं. त्यांच्या रक्तात गाठ आढळली असून त्यांची अँजिओग्राफी केली जाणार आहे. सध्या त्यांची परिस्थिती स्थिर आहे असं डॉक्टरांनी सांगितलं. पुढचे काही दिवस त्यांना वैद्यकीय निरीक्षणाखाली ठेवण्यात येणार असून त्या काळात वंचितच्या प्रचाराची जबाबदारी प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर, निवडणूक समन्वय समिती आणि जाहीरनामा समिती यांच्याकडे राहील असं पक्षसूत्रांनी सांगितलं.